# घटक २ : कल्पनाविस्तार आणि निबंधलेखन

अनुक्रमणिका


**२.० उद्दिष्टे**

**२.१ प्रास्ताविक**

**२.२ शब्दार्थ**

**२.३ कल्पनाविस्तार आणि निबंधलेखन**

२.३.१ कल्पनाविस्तार
२.३.२ कल्पनाविस्तार केलेला नमुना
२.३.३ कल्पनाविस्तार कसा करावा?
२.३.४ निबंधलेखनाचे स्वरूप
२.३.५ नमुना निबंधाचे अध्ययन
२.३.६ निबंधाचे ठळक प्रकार कोणते?
२.३.७ निबंध जुना व नवा

**२.४ नमुना उत्तरे**

**२.५ सारांश**

**२.६ अधिक अध्ययन**

**२.७ सरावासाठी स्वाध्याय**

**२.८ अभ्यासासाठी अधिक वाचन**

## २.० उद्दिष्टे

ऐकणे, बोलणे, वाचन व लेखन ही चार मूलभूत भाषिककौशल्ये आहेत याचा आपण विचार केला. त्यांपैकी लेखनकौशल्य हे महत्त्वाचे. लेखनाचे वेगवेगळे प्रकार तुम्ही अभ्यासत आहात. त्यांपैकी निबंधलेखनाचा विचार करावयाचा आहे. तुमची भाषिक प्रगती किंवा तुमची स्वतंत्र विचारशक्ती अजमावून पाहण्याचे काम निबंध लेखनावरून करता येते.

या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्ही--

- कल्पनाविस्तार आणि निबंधलेखनाचे स्वरूप व त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करू शकाल.
- एखाद्या कल्पनेचा आशय तुम्ही समर्पक शब्दांत मांडू शकाल.
- दिलेल्या विषयावर नीट विचार करून तुम्हाला निबंधलेखन करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

निबंधलेखन ही एक कला आहे. नि + बंध या धातूवरून 'निबंध' शब्द तयार झाला. त्याचा अर्थ बांधणी करायची असा आहे. ही बांधणी कशी करावयाची त्याबद्दलचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे. निबंधाची प्रारंभ, गाभा व शेवट अशी रचना असते. उपोद्घात, आशय व उपसंहार असेही म्हणता येईल. काही निबंधकार पूर्वपक्ष म्हणजे दुसऱ्याचे म्हणणे मांडीत व त्यानंतर उत्तरपक्ष म्हणजे दुसरी बाजू स्पष्ट करीत व मग स्वतःचे त्याबाबतचे निष्कर्ष मांडीत असत. निबंधात 'विषय' घेऊन त्यासंबंधीच्या विचारांची मांडणी करायची असते. आपला निबंध माहितीपूर्ण व्हावा म्हणून विषयाच्या दोन्ही बाजू त्यात स्पष्टपणे मांडाव्या लागतात. त्यासाठी निबंधलेखकाला वाचन करावे लागते, अवलोकन करावे लागते आणि विचार व्यक्त करण्यासाठी त्याच्याजवळ भाषिकक्षमता चांगल्या दर्जाची असावी लागते.

निबंधलेखन चांगले करता यावे म्हणून एखादा मुद्दा विकसित करण्यासाठी छोटे छोटे परिच्छेद लिहता आले पाहिजेत. एखाद्या कल्पनेचा, सुवचनाचा त्याला उदाहरणे देऊन विस्तार करता आला पाहिजे.

## २.२ शब्दार्थ

निबंध–विचारांची नियमबद्ध बांधणी असलेले लेखन.
कल्पनाविस्तार–एखाद्या कल्पनेचा अगर एखाद्या विचाराचे सोदाहरण स्पष्टीकरण करणारा लेख. त्याचा विस्तार एखाद-दुसऱ्या परिच्छेदापर्यंत असतो.
ललितनिबंध–'मी'ने घेतलेला अनुभव निबंधरूपाने मांडलेला असतो.
उपोद्घात–आरंभ, विषयाची प्रस्तावना, विषयप्रवेश, मुद्यांश.
पूर्वपक्ष–वादविवादात एका पक्षाने केलेली आपल्या मताची मांडणी.
उत्तरपक्ष--पूर्वपक्षाच्या मुद्द्याला उत्तर देण्यासाठी दुसऱ्या पक्षाच्या उत्तराची केलेली मांडणी.
उपसंहार–ग्रंथातील विचारांचे सिंहावलोकन.

## २.३ कल्पनाविस्तार आणि निबंधलेखन

### २.३.१ कल्पनाविस्तार

कल्पनाविस्तार हे एक लेखन कौशल्य आहे. एखाद्या वाक्यात एखादी सुंदर कल्पना किंवा एखादा विचार लेखक मांडीत असतो. ती कल्पना किंवा तो विचार आपले लक्ष वेधून घेतो. रामदास म्हणतात की यत्न तो देव जाणावा; तुकोबा म्हणतात की शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी किंवा तात्यासाहेब केळकर लिहितात की ग्रंथ हेच गुरू होत.

या कल्पनेवर किंवा विचारासंबंधी चिंतन करू लागलो तेव्हा आपल्याला वाटते की कल्पनेचा किंवा विचाराचा विस्तार करून पाहता येईल.

खालील गोष्टी लक्षात ठेवा.

- मूळ कल्पनेचे किंवा विचाराचे चिंतन करा.
- त्यातील आशय समजावून घ्या.

- हा आशय स्पष्ट करण्यासाठी आपल्या अनुभवसृष्टीतील उदाहरणे शोधा.
- तुमच्या शब्दांत मांडणी करा.
- कल्पनाविस्तार करताना पुनरावृत्ती करू नका.
- आकर्षक आरंभ, योग्य आशय व प्रभावी शेवट अशी परिच्छेदात्मक रचना करून पाहा.

## २.३.२. नमुन्यादाखल 'माते सारखे दुसरे दैवत नाही' ही उक्ती घेऊ.

साने गुरुजींनी कसा विस्तार केला आहे तो बघा–

"मातेचा महिमा मी किती सांगू? किती गाऊ? प्रत्यक्ष परमेश्वरालाही तो नीट गाता येणार नाही. मातेचे सारे मुलांसाठी. मुलांसाठी तिचा जीव. मुलांसाठी ती वाटेल ते करील. मुलांची सेवाचाकरी करताना ती कधी थकणार नाही. बसणार नाही.

मातेला कोठे काहीही मिळो; स्वतःच्या लेकरासाठी ती घेऊन येईल. मुलांचे जरा काही दुखले-खुपले की ती कावरीबावरी होते. तिला मग अन्न गोड लागत नाही; तिला झोप येत नाही. ती दिवस म्हणत नाही की रात्र म्हणत नाही. ती सारखी सेवाचाकरी करीत असते. मुलाला वाईट म्हटलेले तिला खपणार नाही.

कितीही वाईट मूल असो तिला ते सोन्याचे वाटते, गोड वाटते. सारे सुंदर वाटते. जग मुलाला लोटील, परतु माता लोटणार नाही. स्वतः कुडकुडेल पण मुलाला पांघरूण घालील. स्वतः मरून ती मुलाला जगवील.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) तुमच्या वाचनात आलेल्या पाच कल्पना मांडा.

१. ..............................................................................................

२. ..............................................................................................

३. ..............................................................................................

४. ..............................................................................................

५

(ख) 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' या कल्पनेचा विस्तार करा. (सुमारे १० ओळी)

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

.....................................................................................................................

(ग) खालील वचने/कल्पना कोणाच्या आहेत?

| | |
|---|---|
| १. शिका, लढा, संघटित व्हा. | |
| २. रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल | |
| ३. माझा मराठाचि बोलु कवतुके | |
| ४. जगातील कामगारांनो एक व्हा! | |

## २.३.३ कल्पनाविस्तार कसा करावा?

परिच्छेदलेखन व कल्पनाविस्तार करावयास शिकणे, ही एका अर्थाने निबंधलेखनाची पूर्वतयारी करण्यासारखेच आहे.

आता हे रामदासांचे वचन वाचा.

जो दुसऱ्यावरी विसबला, त्याचा कार्यभाग बुडाला.
या वचनाचे मुख्य विचारसूत्र कोणते?
संत रामदास स्वावलंबनाचे, उपयोगशीलतेचे महत्त्व सांगतात.
या कल्पनेचा विस्तार कसा कराल?

**मुख्य मुद्दे लक्षात घ्या.**

१. माणूस दुसऱ्यावर अवलंबून राहतो आणि त्याला इष्ट ते फळ मिळत नाही.
२. अपयशाचे कारण आळस
३. शेतकरी स्वतः नांगर हाती न धरता नोकरावर विसंबून राहील तर काय होईल?
४. आपला देश अन्नधान्याची आयात करीत असताना एखाद्या देशाने ऐनवेळी धान्य दिले नाही तर काय होईल?
५. शस्त्रास्त्रासाठी परावलंबी असणे योग्य ठरेल काय?
६. विकासासाठी स्वावलंबन, कष्ट व्हावे. रामदासांनीच म्हटले आहे–कष्टाशिवाय फळ नाही.
७. या मुद्द्यांच्या आधारे कल्पनाविस्तार लिहून पाहा.

## २.३.४ निबंधलेखनाचे स्वरूप

निबंधात विचाराची बांधणी करावयाची असते. कोणत्याही विषयाची मांडणी एकतर्फी करून चालत नाही. सर्व बाजूंनी विचार करावा लागतो. जुन्या काळात प्रथम मुद्दे मांडीत, मग मुद्द्यांची दोन्ही बाजूंनी चर्चा करीत आणि मग उपसंहार करीत.

निबंधलेखन करण्यापूर्वी खालील गोष्टी लक्षात ठेवा.

- आपण जे वाचतो, ऐकतो व अनुभवतो त्याचा निबंधलेखनाला फायदा होतो.
- सतत वाचन, मनन व चिंतन करावे.
- विषयाची निवड करताना आपली पूर्वतयारी, आवड, रचना, ठळक मुद्दे इत्यादी बाबी विचारात घ्याव्यात. आपल्या कुवतीबाहेरचा विषय निवडू नये.
- निबंधलेखन करण्यापूर्वी मुद्द्यांचे टाचण करून संबंधित विषयाची रूपरेषा तयार करावी.
- परिच्छेद नीट पाडावेत. एका परिच्छेदात एक विचार मांडावा. दुसऱ्या विचारासाठी दुसरा परिच्छेद लिहावा व तर्कशुध्द पध्दतीने विषयाची सर्वांगीण चर्चा करावी.
- समर्पक उदाहरणे, अवतरणे इत्यादी योजावीत.
- आरंभ आकर्षक व शेवट परिणामकारक असावा.
- जे मांडायचे ते आपल्या खास शैलीत व्यक्त करावे.

## २.३.५. नमुना निबंधाचे अध्ययन

आता हा निबंध वाचा.

आमच्या देशातले उच्च शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही असे माझे स्पष्ट मत आहे. मी हे जे बोलतो आहे ते निव्वळ भाषेच्या अभिमानाने बोलत नाही. मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे. पण मी भाषेचा संकुचित अर्थाने अभिमानी राहिलेलो नाही, हेही तितकेच खरे आहे. भाषा ही माणसांना एकत्र आणण्याचे साधन बनण्याऐवजी त्यांच्यात ती दुरावा निर्माण करील की काय अशी आज आपल्याला भीती वाटू लागली आहे. पण याचा आणि शिक्षणाच्या माध्यमाचा काहीही संबंध नाही. शिक्षण आम्हाला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवावयाचे असेल तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे? दीडशे वर्षे इंग्रजांचे या देशावर राज्य होते. ते गेल्यानंतरही आम्ही शिक्षण इंग्रजीतून देण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण शेवटी आज किती लोकांना इंग्रजी येते? म्हणजे नवा विषय समजण्याइतके, वर्तमानपत्रातील मथळे वाचण्यापुरते नव्हे. शेकडा चार टक्के लोकांनाही येत नाही. म्हणजे या बाबतीत देशातले शहाण्णव टक्के लोक या देशामध्ये ज्ञानाला परके आहेत, असा याचा अर्थ होतो. हे काय शास्त्र आहे? आम्ही म्हणतो की, या देशामध्ये आम्हांला लोकशाहीची वाढ करावयाची आहे, आम्हाला सामान्य माणसाला मोठे करावयाचे आहे. पण अशाने सामान्य माणूस मोठा होणार कसा? त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकी भाषा शिकण्यात निघून गेली तर तो पुढे काय करणार आहे? याचा खरोखरी अधिक खोलवर विचार झाला पाहिजे.

उच्च शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे याला एक दुसरेही कारण आहे. ते काहीसे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. क्रांती होऊन, सामाजिक उलथापालथ करून एक प्रकारचे नवीन तऱ्हेचे जीवन बनले असे फारसे हिंदुस्थानात कधी घडलेले नाही. याचे खरे कारण असे आहे की, सामान्य माणसापर्यंत महत्त्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जाऊच दिले नाही. हा मुद्दा थोडक्यात सांगावयाचा झाला तर मी असे म्हणेन की, ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही.

ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. पूर्वी ऋषिमुनींची आणि पंडितांची ज्ञानभाषा संस्कृत होती तर जनसामान्यांची भाषा प्राकृत. पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अमलात ज्ञानभाषा उर्दू, फारसी, अरबी जी काही असेल ती झाली. त्यानंतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हाला विकसित करावयाचे आहे, तेव्हाही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ देता कामा नये असे माझे खंबीर मत आहे. काही लोक विचारतात की, तुम्ही कोर्टात जाल तेव्हा मराठी बोलणार काय? पण मी म्हणतो कोर्टात मराठी बोलले तर बिघडले कुठे? राज्याची भाषा जर मराठी झाली आहे, मल्याळम झाली आहे, बंगाली झाली आहे, तर मग कोर्ट काय राज्याच्या बाहेर आहे? पण मी हे जे बोलतो आहे ते मराठीच्या अभिमानाने बोलत नाही. माझा जो मुद्दा आहे तो फार महत्त्वाचा मुद्दा आहे. उच्च शिक्षणासंबंधाने आम्ही जेव्हा बोलतो आहोत तेव्हा तो आम्हाला एकदा अगदी स्पष्ट केला पाहिजे.

महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाशाला आहे. संस्कृतमधल्या ज्ञानाचा मक्ता सगळी विद्वान मंडळी घेऊन बसली होती. त्या विद्वानांच्या तावडीतून ज्ञानाला सोडवून मराठीत ज्ञानाचा पहिला वृक्ष ज्ञानेश्वरांनी नेवाशाला लावला. महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल तेथे टाकले.

उच्च क्षिशणाच्या माध्यमाबाबत मी आपल्याला एक प्रश्न विचारू इच्छितो. मराठी भाषेतून उच्च शिक्षण देता येणार नाही असे आपण का म्हणता? आम्ही मोठ्या अभिमानाने सांगत असतो की, "अमृतातेही पैजा जिंके" अशी प्रतिज्ञा करून रसिकांचे मन वळवीत ही भाषा ज्ञानाच्या दिशेने पावलामागून पावले टाकीत चालली आहे. मग तिला अलीकडचे काही समजणार नाही हे कसे? खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जसजशी निर्माण होतील, वाढतील, तसतशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले; भाषा आली, मग नंतर मोटार आली आणि त्या मोटारीबरोबर कितीतरी नवे शब्द आले. एक नवी परिभाषा आली. साखर कारखान्यांबरोबर कितीतरी नव्या कल्पना आल्या, नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेऊन आपल्यापाशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वतःच संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे. तेव्हा भाषा ही सतत वाढत राहील, याबद्दल शंका नको. आम्ही जर ठरविले की, रसायनशास्त्र हे मराठीतून शिकवावयाचे तर त्यात काय अवघड आहे? त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे हे मात्र खरे आहे. पण निव्वळ परक्या लोकांच्या ग्रंथांचे मराठीत भाषांतर करून मराठी भाषा वाढेल असे नाही. माझ्या मते भाषांतरी भाषा फारशी चांगली नसते. जमिनीतले पाणी, जमिनीतली सत्त्वे आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल ती घेऊन पिऊन जमिनीतून ऊस जसा वाढत जातो तशी भाषा ही जिवंत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल, अधिकाधिक उत्कर्ष पावेल.

शिक्षणाचा भाषेशी निकट संबंध असतो म्हणून मी हे सर्व बोलतो आहे. आपल्या घटनेमध्ये ज्यांचा उल्लेख केला आहे त्या सगळ्या भाषा महत्त्वाच्या आहेत. या सर्व भाषा उच्च शिक्षणाचे माध्यम बनल्या पाहिजेत. पण त्यासाठी इंग्रजीवर बहिष्कार टाकण्याचे कारण नाही. इंग्रजी ही एक अभ्यासाची भाषा राहील.

मार्क्सचा 'कॅपिटल' हा ग्रंथ मोठा गुंतागुंतीचा आहे. इंग्रजीतून वाचतानासुद्धा तो लवकर समजत नाही. परंतु गाडगीळांनी तो मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. आज खेड्यातला कार्यकर्ता मार्क्सवादावर आणि समाजवादावर साध्या शेतकऱ्याला समजेल इतक्या सुरेल भाषेत व्याख्याने देत असतो. कुठून आले हे सर्व? काही मंडळींनी प्रयत्न केले आणि त्याबरोबर ही भाषा रुळावयास लागली. तेव्हा महत्त्व विचाराचे आहे. भाषा आपोआप त्याच्या पाठीमागे येऊ लागते आणि म्हणून आपण इंग्रजीतून शिकलो तेव्हा आपल्याला आता मराठीतून कसे शिकविता येईल, ही भीती विद्वानांनी मनात कधीच बाळगू नये. हे हळूहळू सहज जमेल अशी माझी स्वतःची श्रद्धा आहे.

'यशवंतराव चव्हाणांच्या' या निबंधात खालील मुद्दे आहेत.

१. उच्च शिक्षण मातृभाषेतून द्यावे
२. लोकभाषा व ज्ञानभाषा यातील फरक
३. लोकभाषा ही ज्ञानभाषा होणे जरूरीचे
४. मराठी माध्यमामुळे भाषा संपन्न होईल.

आता हा निबंधाचा प्रकार कोणता?
हा वैचारिक निबंध आहे. मातृभाषा शिक्षणाचे माध्यम का असावे याची चर्चा आहे.
आपल्या वाचकाला विश्वासात घेऊन ही चर्चा केली आहे.

## २.३.६ निबंधांचे ठळक प्रकार कोणते?

**१. वैचारिक निबंध**

२.३.५ मध्ये आपण अभ्यासला तो आहे.

**२. व्यक्तिचित्रणात्मक निबंध**

लोकोत्तर व्यक्ती किंवा सामान्य व्यक्तीविषयी लिहिता येईल.
उदा. पोस्टमन, झाडूवाला, मोलकरीण, कारकून इत्यादी किंवा
महात्मा गांधी, पंडित नेहरू, लो. टिळक, महात्मा फुले इत्यादी.

**३. वर्णनात्मक निबंध**

एखादे स्थळ, प्रसंग, घटना, वस्तू, देखावा यांचे वर्णन केलेले असते.
संध्याकाळ, चांदण्या रात्रीची सहल, घड्याळदादा, रेल्वे स्टेशनवर एक तास, इत्यादी

**४. आत्मवृत्तात्मक निबंध**

यातील निवेदन आत्मपर असते.
उदा. एका जीर्ण किल्ल्याचे महत्त्व, एका पोस्टाच्या पेटीचे आत्मवृत्त इत्यादी.

**५. कल्पनात्मक निबंध**

येथे कल्पनाशक्ती लढवून लिहिण्यास अवसर आहे.
उदा. मी पंतप्रधान झालो तर!
मला लाख रुपये मिळाले तर!

**६. लघुनिबंध**

कोणत्याही विषयाचा विचार 'मी'च्या अनुभवांतून केलेला असतो. ना. सी. फडके यांनी 'गुजगोष्ट' म्हणून हा प्रकार सुरू केला. हरवली म्हणून सापडली, पहिला पांढरा केस इत्यादी. त्यांचे निबंध याच प्रकारचे. लघुनिबंधात विषयापेक्षा तो लिहणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाला महत्त्व असते. जलाशयात एखादा खडा टाकल्यावर तेथे जशी जलवलये निर्माण होतात तद्वत एखाद्या विषयाच्या निमित्ताने लेखकाच्या मनःसरोवरात विचारांची वलये निर्माण होतात. वाचकाशी केलेले हितगुज म्हणजे लघुनिबंध. रचनेची खटपट असावी पण ती वाचकाला जाणवू देता कामा नये.

**७. मुलाखत असलेला निबंध**

एखाद्या व्यक्तिची मुलाखत घेऊन त्याला विचारलेल्या प्रश्नांच्या आधाराने निबंध तयार करावा.

## २.३.७ निबंध : जुना व नवा

मराठी निबंधाची वाटचाल पाहिली की लक्षात येईल मराठी निबंध श्रीमंत आहे. विषय, शैली, जीवनदर्शन इत्यादी अनेक दृष्टीने मराठी निबंध समृद्ध आहे. उपोद्घात, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष, उपसंहार अशी जुन्या निबंधाची रचना होती. नव्या निबंधाची रचना ताठर नाही ती लवचिक आहे. स्वमतप्रतिपादन आणि परमतखंडन या प्रेरणेतून जन्माला आलेल्या निबंधात लढाऊपणा, आक्रमकवृत्ती, तर्कशुद्ध युक्तिवाद, समर्थनार्थ अवतरणे, सुभाषितांची योजना, पल्लेदार वाक्यरचना इत्यादी गुण अपरिहार्यपणे आढळतात. नव्या निबंधामागे आत्माविष्काराची प्रेरणा आहे. कोणत्याही विषयाच्या निमित्ताने लेखक आपले चिंतन व्यक्त करू शकतो. एका लेखकाने नव्या निबंधाच्या विषयाबाबत म्हटले आहे की–Any peg will do to hang the hat on; it is the hat that matters. नवा निबंधकार आपल्या वाचकांशी जिव्हाळ्याचे हितगुज करतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(घ) तुम्हाला आवडलेले तीन निबंधप्रकार कोणते?
१
२
३

(ङ) निबंधलेखनासाठी विषय कसा निवडावा?

(च) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा
१. लघुनिबंधकार वाचकांशी मोकळेपणाने हितगुज करतो.
२. वैचारिक निबंधात चर्चा करावी पण निष्कर्ष काढ नये.

३. निबंधाची भाषाशैली अलंकारिक, क्लिष्ट नसावी.
४. आत्मवृत्तपर निबंधाचे यश कल्पनाशक्ती, निवेदनरीती आणि भाषाशैली यावर अवलंबून आहे.
५. निबंधलेखनासाठी पूर्वतयारी नको; जसे सुचेल तसे लिहावे.

(छ) जोडया लावा. निबंधलेखकाचे नाव व निबध अशी जोडी लावावी.

| | |
|---|---|
| १. ना. सी. फडके | अ. शेतकऱ्याचा असूड |
| २. लो. टिळक | ब. दोन शब्दांत दोन संस्कृती |
| ३. गो. ग. आगरकर | **क. पुनश्च हरि ॐ** |
| ४. स्वातंत्र्यवीर सावरकर | ड. परिपूर्ती |
| ५. जोतिराव फुले | इ. पहिला पांढरा केस |
| ६. इरावती कर्वे | फ. आमचे घोर दारिद्र्य |
| ७. साने गुरुजी | |

## २.४ नमुना उत्तरे

(क) १. यत्न तो देव जाणावा
२. शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी
३. करावे तसे भरावे
४. सत्यापरता नाही धर्म
५. उद्योगाचे घरी ऋद्धीसिद्धी पाणी भरी.

(ख) **जनसेवा हीच ईश्वरसेवा**
माणसाला वाटते की ईश्वराची एकनिष्ठपणे भक्ती केली की माणसाला मोक्ष मिळतो. त्याच्या लक्षात येत नाही की देव देवळात नाही तो माणसात आहे. माणसातला देव जागा होतो आणि तो माणसाची सेवाभावीवृत्तीने सेवा करतो. समाजात दुःख फार आहे. दुःखितांचे अश्रू पुसण्याची प्रेरणा आपण गांधीजींपासून घेतली पाहिजे. त्यांच्याप्रमाणे गरिबांबरोबर काम केले पाहिजे. जनसेवेचे व्रत आचरले पाहिजे. समाजाच्या कल्याणाची ती किल्ली आहे. आपले ममत्व केवळ आपल्या गोतावळ्यांपर्यंत पसरते. त्याचा उपयोग नाही. लक्षात ठेवा, समतेचा मार्ग ममतेतून जातो. जो माणसाविषयी ममत्व बाळगतो तो ईश्वराचा लाडका होतो.

(ग) १. डॉ. आंबेडकर
२. कवी कुसुमाग्रज
३. संत ज्ञानेश्वर
४. कार्ल मार्क्स

(घ) वैचारिक निबंध, वर्णनात्मक, कल्पनात्मक

(ङ) निबंध लेखनासाठी विषय निवडताना आपल्याजवळ सांगण्यासारखे आहे काय, आपण प्रभावी भाषेत सांगू शकतो काय आणि आपली विषयाला न्याय देण्याची कुवत किती ते विचारात घ्यावे लागते.

(च) १. बरोबर २. चूक ३. चूक ४. बरोबर ५. चूक

(छ)

| | |
|---|---|
| ना. सी. फडके | पहिला पांढरा केस |
| लो. टिळक | पुनश्च हरि ॐ! |
| गो. ग. आगरकर | आमचे घोर दारिद्र्य! |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | दोन शब्दात दोन संस्कृती |
| जोतिराव फुले | शेतकऱ्याचा असूड |
| इरावती कर्वे | परिपूर्ती |

## २.५ सारांश

कल्पनाविस्तार आणि निबंधलेखन ही दोन प्रगत लेखन कौशल्ये आहेत. ती आत्मसात केली पाहिजेत. एखादा विचार किंवा एखादी कल्पना सोदाहरण स्पष्ट करण्याची कला कल्पनाविस्तार व परिच्छेदलेखनासाठी आत्मसात केली पाहिजे. निबंधलेखनात मात्र एका विषयाची सर्वांगांनी चर्चा करायची असते.

निबंधलेखनासाठी पूर्वतयारी करावी लागते. वाचन-मनन-चिंतन आवश्यक आहे.

मराठी निबंधाचा विकास अनेक अंगांनी झाला. स्वमतप्रतिपादन व परमतखंडन या प्रेरणा प्रामुख्याने जुन्या निबंधामागे होत्या. नवा निबंध आत्माविष्काराची प्रेरणा घेऊन जन्मला. वैचारिक, वर्णनात्मक, आत्मवृत्तात्मक, कल्पनात्मक, ललित निबंध असा कोणताही निबंध लिहावयाचा झाला तरी त्यात आशय, आशयाची मांडणी, भाषाशैली, दृष्टिकोन इत्यादी व्यक्त होणे आवश्यक आहे.

## २.६ अधिक अध्ययन

प्रत्येक भाषेतील निबंधवाङ्मय समृध्द आहे आणि निबंधकारांची परंपरा खंडित झालेली नाही. प्रत्येक भाषेतील निबंधवाङ्मय समृध्द करण्याचा एक मार्ग म्हणजे प्रत्येक भाषेतील चांगल्या निबंधाचे भाषांतर करून त्या निबंधाचा वाचकांना परिचय करून ध्यायचा.

असाच एक भाषांतारित निबंध वाचूया.

माझ्या स्वतःच्या आठवणीतला पहिला प्रसंग म्हणजे गांधीजींच्या आवाहनावरून साऱ्या देशभर परदेशी कापडाची होळी करण्याची जी मोहीम सुरू झाली त्या दिवसाचा. त्या दिवसाची सारी गडबड माझ्या अजूनही चांगली लक्षात आहे. उंची, रंगी बेरंगी कपडयांच्या ढिगांनी सारी गच्ची भरली होती. मखमलीच्या, सॅटिनच्या, रेशमी वस्त्रांच्या आणि शिफॉनच्या ढिगाऱ्यातून शिवाशिवीचा खेळ खेळण्यात माझ्यासारख्या चिमुरडया मुलीला केवढी गंमत वाटत होती. माझा माझ्या आई-वडिलांवर केवढा प्रभाव होता ही गोष्ट माझ्या लक्षात आली तीही याच दिवशी! सारेजण होळी बघायला जात होते आणि मला मात्र झोपविण्यात येत होते! याविरुद्ध मी माझ्या आजोबांकडे धाव घेतली आणि त्यांनीही नेहमीप्रमाणे माझीच बाजू घेतली. परंतु आम्ही गच्चीवर जातो तोच मला झोपेने घेरले. कपडयांच्या ढिगाऱ्यावर जळती लाकडे टाकली जात होती आणि कपडयांनी पेट घेतला होता एवढेच पाहिल्याचे आठवते.

यानंतर काही कालाने पहिल्याप्रथमच सदसद्विवेकबुद्धी आणि कर्तव्य यांच्यामधला संघर्ष माझ्या मनात उद्‌भवला. मी घरातले एकुलते एक मूल असल्यामुळे एकटयानेच खेळायला मला आवडे. तरीपण आई जवळपास असावी असेही मला वाटे. एके दिवशी संध्याकाळी तिच्याकडे एक पाहुणी आली होती. ती आमची नातेवाईकच होती आणि पॅरिसहून परत येताना तिने माझ्यासाठी कशिदा काढलेला पोषाख आणला होता. आईने तो पाहिला आणि हसत हसत तिच्याकडे परत दिला आणि म्हणाली, "आम्ही आता हातसुताचे आणि हातविणीचे कपडे वापरतो." आलेल्या पाहुणीला माझ्या आईचे हे बोलणे क्षणभर समजलेच नाही पण मग तिने माझ्या आईच्या कपडयांकडे जेव्हा बघितले तेव्हा ती आश्चर्यचकितच झाली. त्याकाळी जी खादी मिळत असे ती जाडीभरडी आणि गोणपाटासारखी असे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी अंगावरची साडी अंगाला घासली होती त्या त्या ठिकाणी त्वचा लालीलाल झाली होती. तिच्या हे लक्षात आले तशी ती भडकली आणि म्हणाली, "मला वाटते तुम्हा साऱ्यांना वेड लागलं आहे, पण तुम्ही एक जाणती माणसं आहा, तुम्हांला वागायचं आहे तसं खुशाल वागा. तो तुमचा प्रश्न आहे पण म्हणून या बिचाऱ्या छोटया मुलीवर तुमच्या इच्छा लादण्याचा तुम्हांला अधिकार नाही. मी ही भेट आणली आहे ती तिच्यासाठी!" तिचे हे बोलणे ऐकून माझी आई म्हणाली, "इंदू, इकडे ये बघू! हे बघ तुझ्या आंटीनं हा परदेशी फ्रॉक तुझ्यासाठी आणलाय! किती छान आहे! तुला आवडला तर तू तो घाल पण परदेशी वस्तूंची आपण होळी केली होती त्याचीही आठवण ठेव! आम्ही सारीजणं खादी वापरीत असताना तुला हा फ्रॉक घालणं आवडेल का त्याचा विचार कर." मला त्या फ्रॉकचा मोह आवरत नव्हता, माझी दृष्टी त्याच्यावर खिळली होती आणि तो घेण्याकरिता पुढे केलेला हात त्याला लागण्याआधी माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, "घेऊन जा तो तुम्ही. मी कधीच वापरणार नाही तो." त्या पाहुणीने माझा पिच्छाच पुरवीत म्हटले, "अग पण का नाही? तुला तो आवडला नाही का?" तिचे बोलणे ऐकून मी म्हटले, "मला तो आवडलाय.... खरंच आवडलाय...." आणि मग या विषयावर वडीलधाऱ्या माणसांची घरात चालणारी जी बोलणी माझ्या कानावरून गेली होती ती सारी तिला ऐकवली तशी ती म्हणाली, "बरं, बाई.... पण मग तुझ्याजवळची परदेशी बाहुली कशी चालते ग?" फारसा विचार न करता सहज उच्चारलेले ते शब्द माझ्या मनाला लागले. मोठया माणसांना मुले म्हणजे यःकश्चित वस्तूसारखी वाटतात. ती बोलत नाहीत त्यामुळे त्यांच्या मनातले त्यांना समजतच नाही. मला तर त्या बाहुलीचे अगदी वेडच होते. तिच्याशिवाय मला काही सुचत नसे. त्या वयात हातातल्या कोणत्याही वस्तूला आम्ही नाव ठेवलेले असायचे आणि त्याच्यावरूनच ती ओळखली जायची. ती बाहुली तर जणू माझी मैत्रीण होती, माझी सोनुली-छकुली होती.

कितीतरी दिवस—की कितीतरी आठवडे? किती का असेनात, बरेच दिवस माझ्या मनात एक प्रकारचा संघर्ष सुरू होता. पण अखेर मी निर्णय घेतला. भावनातिरेकाने कापत कापत मी माझी बाहुली घेऊन गच्चीवर गेले आणि काडी पेटवून ती पेटवली. ते पाहताना डोळ्यातून घळाघळा पाणी वाहायला लागले आणि ते थांबेनाच. त्यानंतर काही दिवस मी तापाने फणफणत आजारीही पडले. अजूनही काडी पेटवायची माझ्या जिवावर येते.

मला काय आवडते? पहिली गोष्ट अशी की यात गुप्त असे काही नाही पण लोकांना काहीतरी नेत्रदीपक हवे असते. त्यामुळे साध्या गोष्टी त्यांना दिसत नाहीत. तथापि माझ्या आवडीनिवडींची ही यादी सूचक आहे, व्यापक नाही.

माझ्या आवडीच्या वस्तूंची नावे सांगणे तसे कठीण नाही. पण मला आनंद देणाऱ्या बारीकसारीक वस्तू इतक्या आहेत की ही यादी कदाचित फार लांबलचक होईल. फारसा विचार न करता मी असे म्हणेन की मला खाण्याचे विविध पदार्थ आवडत असले तरी मला 'आवडणाऱ्या' गोष्टींत काही मी त्यांचा समावेश करणार नाही. ज्या भागात किंवा देशात मी जाते तेथील अन्नच खाणे मला आवडते. पण मला अति मसालेदार अन्न आवडत नाही. मी साधेच जेवण पसंत करते.

मी प्राण्यांचा आणि पक्ष्यांचा उल्लेख करीत नाही. कारण त्यांच्याबद्दलची माझी आवड आणि आस्था सुपरिचित आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी लंडनमध्ये अनेक लोकांच्या बरोबर छोट्या जागेत कोंडून घेऊन बराच वेळ जेव्हा घालवावा लागत असे (त्यातले बहुतेक एकमेकांना अपरिचितच असत) तेव्हा अनेक प्रकारचे बालिश खेळ, मुख्यतः बोलण्याची सुरुवात करण्यासाठी आणि एकमेकांच्या खाजगी जीवनात न डोकावता ओळख होण्यासाठी, खेळले जात असत. कोणता प्राणी होणे तुम्हाला आवडेल—असा एक प्रश्न विचारला की मी उत्तर देत असे की भारतीय काळवीट होणे मला आवडेल. कोणी तरी म्हणाले की याचे कारण बहुधा माझे डोळे फार मोठे आहेत, मी सडपातळ आहे आणि मी छान धावते म्हणून.

पुस्तकांचा अंतर्भावही बहुधा प्रत्येकाच्या आवडणाऱ्या वस्तूंच्या यादीत असतोच. पण मला मोह पडतो तो शब्दकोशांचा, विशेषतः शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा उगम सांगणाऱ्या व्युत्पत्तिकोशांचा.

मला पाऊस, पावसात फिरणे आणि त्याचा ताजेपणा चेहऱ्यावर अनुभवणे हे आवडते. पहिला पाऊस पडल्यावर मातीचा जो सुगंध येतो—त्याला हिंदीत सोंधी म्हणतात—तोही मला आवडतो. रस्ते आणि घरे कशी स्वच्छ दिसतात. झाडांची पाने कशी चकाकतात. कोवळी लुसलुशीत फुलासारखी दिसणारी नवी पालवी मला आवडते. सहस्त्रावधी आकारांची आणि रंगांची, भूमीच्या आणि हवामानाच्या प्रतिकूल परिस्थितीत मोठ्या कष्टाने जगणारी आणि कोठेही कानाकोपऱ्यात डोकावणारी वन्य फुले मला आवडतात. पण त्याहूनही अधिक जुनी, बुंध्याला गाठी असलेली आणि विस्तारलेल्या शाखांची झाडे मला अधिक प्रिय असतात. त्यांच्या छायेखाली केवढा आराम, प्रसन्नता आणि प्रतिष्ठा वाटते. इतिहासाची जाणीव होते. हिरव्यागार झाडांनी आणि वृक्षराजीने भरलेले छोटे डोंगर आणि सदा बर्फाच्छादित असलेले आणि भीतीदायक हिमनद्यांनी भरलेले पर्वत म्हटले की त्यांच्याशी आपले काही भावनात्मक नाते आहे असे मला वाटते. सामर्थ्याची आणि सातत्याची जाणीव ते सारखी देत असतात.

मला दऱ्याखोऱ्यांत विशेषतः ज्या ठिकाणी पायवाटा नाहीत अशा जंगलात फिरणे आवडते. पाणी—विशेषतः उष्ण देशात कसे थंडगार व ताजेतवाने करणारे वाटते. डोंगर भागातले शांत आणि पाचूच्या रंगाचे तलाव, द्रुतगतीने जाणारे डोंगरातील जलप्रपात, सारे आजूबाजूचे आवाज बुडवून टाकणारी सागराची गर्जना, या गोष्टी मला आवडतात. संथपणे वाहणाऱ्या किंवा फेसाळत धावणाऱ्या नद्या आणि सागराचा अमर्यादपणा मला फार आवडतो.

वाहणाऱ्या पाण्याचा नाजूक मृदू ध्वनी व वल्ह्यांतून उडविलेल्या पाण्याचा आवाज हे जसे माझ्या कानाला आल्हाद देतात, तसेच घोड्यांच्या टापांचे आवाजही मोठे आल्हाददायक नसले तरी आगगाड्यांच्या शिट्या आणि आगबोटींचे भोंगे मला फार आवडतात. खरे तर आगगाड्या आणि आगबोटीसुद्धा!

मी दौऱ्यावर असले की जुने किल्ले पाहणे मला फार आवडते.

हिरव्यागार गवतावर (आपल्या अंगावर चढणारे व सरपटणारे प्राणी त्यात नसतील तर) बसणे मला आवडते. भूमातेच्या आपण अगदी सन्निध आहो अशी भावना त्यामुळे माझ्या मनात निर्माण होते. दवाने भिजलेल्या गवतावर अनवाणी चालणेही मला मोठे आनंददायक वाटते. बालपणाच्या कालात झाडांच्या फांद्यांवर जाऊन बसणे मला आवडे, कारण त्यामुळे निसर्गसाहचर्य मला लाभे. साडीसारखे सैल कपडे घालणाऱ्याला वाऱ्याचा उपद्रव होतो. पण शेतातील पिकांना हळुवारपणे हलवणारी वाऱ्याची झुळूक पाहणे केवढे आल्हाददायक असते!

हा श्रीमती इंदिरा गांधींचा निबंध आहे. मूळ इंग्रजी उताऱ्याचे हे भाषांतर आहे.

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

१. श्रीमती गांधी यांच्या वरील निबंधाचे गुणदोष सांगा.

२. थोरामोठ्याचे जसे छंद आहेत तसे तुमचे काही छंद आहेत काय ते सांगा. एका छंदाविषयी तुम्ही निबंध लिहा.

३. खाली मुद्दे दिले आहेत त्यांच्या आधारे निबंध लिहा.

अ) पावसाळ्यातील एक दिवस
पाऊस येण्यापूर्वीचे वातावरण—पावसाची कोण वाट पाहात होते का? पाऊस पडतानाचे निसर्ग सौंदर्य—पावसानंतर काय काय घडून आले?
तुमच्या प्रतिक्रिया.

ब) थापा मारण्याची सवय
थापा म्हणजे काय?–त्यांचे प्रकार–अतिरंजित सबबी.
थापांचे नमुने

४) खाली दिलेल्या विषयावर निबंध लिहून पाहा.

क) लोकशाही यशस्वी कशी होईल?
ब) राष्ट्रीय एकात्मता
ग) पर्यावरणरक्षणाची गरज
घ) शाळेतला/महाविद्यालयातील पहिला दिवस
ङ) विज्ञानाचे महत्त्व
च) विनोदाचे जीवनातील स्थान
छ) मी राष्ट्रपती झालो तर!
ज) युध्द की शांतता?
झ) आदिवासी खेड्यातील जीवन
ञ) रोजगार व युवक

## २.८ अभ्यासासाठी अधिक वाचन

१. व्यावहारिक मराठी : संपा. जोगळेकर–फडके–कुलकर्णी
२. व्यावहारिक मराठी : डॉ. कल्याण काळे व डॉ. दा. दि. पुंडे